# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/८०/२०२४-२५ दि. १९/०८/२०२४

प्रति,
**सिस्टीम मॅनेजर**
**संगणक विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करणेची बाब महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणा-या सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करणेची बाब नागरिक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना कळविण्याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

(योगेश गुणिजन)
**सहा. आयुक्त (पर्यावरण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव :-
**जनसंपर्क अधिकारी,**
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

ई-मेल : save.environs@mbmc.gov.in


## // जाहिर आवाहन //

सन २०२४ या वर्षी सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार असून यासंबंधी शासन निर्णय क्र. पुलदे-२०२४/प्र.क्र.१११/सां.का.२ दि.३१ जुलै २०२४ अन्वये निकष जारी करण्यात आलेले आहेत. तसेच याकरिता जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्यात आलेली आहे. **सदर स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभाग घेता येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर सदर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज दि.०१/०८/२०२४ ते दि.३१/०८/२०२४ पूर्वी सादर करायचे आहेत.**

सदर स्पर्धेतील पुरस्कारामध्ये प्रथम क्रमांकासाठी ५.०० लक्ष, व्दितीय क्रमांकासाठी २.५ लक्ष व तृतीय क्रमांकासाठी १.०० लक्ष पुरस्कार रक्कम जाहिर करण्यात आलेली आहे. तसेच राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीकडून निवड करण्यात येणाऱ्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना जाहिर आवाहन करण्यात येते की, त्यांनी सदर स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा.

अधिक तपशिल मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**Note # 1**

**सादर,**

**विषय :-** सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणा-या राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्याबाबत...

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. पुलदे-2024/प्र.क्र.111/सां.का.2दि.31 जुलै 2024.

सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणा-या राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी सहभागी व्हावे, याकरीता राज्यातील सर्वोत्कृष्ट, पर्यावरण पूरक तसेच सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणे हा उपक्रम व्यापकपणे राबविण्यात आलेला असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा चांगला प्रतिसाद लाभलेला आहे. तसेच पर्यावरणपूरक सुचनांची अंमलबजावणी होण्यास मदत झालेली आहे.

सदर स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभाग घेता येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या ई-मेलवर सदर स्पर्धेचे परिपुर्ण अर्ज दि.01/08/2024 ते दि.31/08/2024 पुर्वी सादर करायचे आहेत. सदर गणेशोत्सव स्पर्धेअंती राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विजेत्या सार्वजनिक गणेश मंडळांची यादी स्वतंत्रपणे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर शासन निर्णयाव्दारे निर्गमित करण्यात येणार आहे.

सन 2024 या वर्षी सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार असून यासंबंधी संदर्भिय शासन निर्णयानुसार निकष जारी करण्यात आलेले आहेत. तसेच याकरिता जिल्हास्तरीय निवड समिती गठीत करण्यात आलेली आहे. पुरस्कारामध्ये प्रथम क्रमांकासाठी 5.00 लक्ष, व्दितीय क्रमांकासाठी 2.5 लक्ष व तृतीय क्रमांकासाठी 1.00 लक्ष पुरस्कार रक्कम जाहिर करण्यात आलेली आहे. तसेच राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीने निवड केलेल्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

वरील बाब नागरीक तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना कळविण्यासाठी मिरा-भाईंदर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देणे, मनपाच्या आयईसी वाहनाव्दारे जनजागृती करणे तसेच वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासंबंधी जाहिर आवाहन प्रसिद्ध करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर.

eSign



File No. MBMC-36013/3/2024-ENV (Computer No. 722270)
Generated from eOffice by Mahendra Mangal Dhamane, CLRK(MD)ENV, CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 16/08/2024 01:51 PM

**12/08/2024 06:55 PM** **Mahendra Mangal Dhamane**
**CLERK**

---

**Note # 2**

प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यतेस्तव शिफारस आहे.

**12/08/2024 07:02 PM** **Yogesh Suresh Gunijan**
**ASSISTANT MUNICIPAL COMMISSIONER**
Digitally Signed

---

**Note # 3**

नोट क्रमंक १ नुसार जाहीर आवाहन करणेस शिफारस आहे.

**13/08/2024 03:36 PM** **Kalpita Pimple**
**DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER**
Digitally Signed

---

**Note # 4**

प्रस्तावित मान्य होणेस विनंती आहे.

**14/08/2024 10:44 AM** **ANIKET ARUN MANORKAR**
**ADDL. COMMISSIONER**
Digitally Signed

---

**Note # 5**

प्रस्तावित केले प्रमाणे मान्य

**15/08/2024 12:23 PM** **SANJAY SHRIPATRAO KATKAR**
**COMMISSIONER**
Digitally Signed

---

**Note # 6**

**15/08/2024 07:11 PM** **ANIKET ARUN MANORKAR**
**ADDL. COMMISSIONER**

---

**Note # 7**

**16/08/2024 12:52 PM** **Kalpita Pimple**
**DEPUTY MUNICIPAL COMMISSIONER**

Digitally Signed

---

**Note # 8**

**16/08/2024 01:02 PM** **Yogesh Suresh Gunijan**
**ASSISTANT MUNICIPAL COMMISSIONER**

---

सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणा-या राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०२४/प्र.क्र.१११/सां.का.२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक : ३१ जुलै, २०२४

**संदर्भ**- संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.पुलदे-५९०, दिनांक ०३.०७.२०२४

**प्रस्तावना :**

लोकमान्य टिळकांनी जनजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव आयोजित करण्याची प्रथा सुरु केली. सार्वजनिक गणेशोत्सवात जास्तीत जास्त सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, याकरीता सन २०२३ मध्ये राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात आले होते.त्याच धर्तीवर सन २०२४ च्या गणेशोत्सवात सहभागी होणा-या राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :**

सन २०२४ च्या सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत जास्तीत जास्त मंडळांनी सहभागी व्हावे, याकरीता दि.०७.०९.२०२४ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. **सदर पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहिल :-**

**२.१** सदर स्पर्धेत, धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना सहभागी होता येईल.

**सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल -**

| अ.क्र. | गुणांकनासाठी बाब | गुणांकन |
|---|---|---|
| १. | **सांस्कृतिक कार्यक्रम / स्पर्धांचे आयोजन(प्रत्येकी २ गुण)**<br>➢ गायन<br>➢ वादन<br>➢ नृत्य | २० |

| | | |
|---|---|---|
| | ➢ नाटय<br>➢ लोककला<br>➢ आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला<br>➢ हस्तकला<br>➢ चित्रकला<br>➢ शिल्पकला<br>➢ माहितीपट/चित्रपट | |
| २. | **संस्कृतीचे जतन/ संवर्धन(प्रत्येकी २ गुण)**<br>➢ संस्कृती संवर्धनासाठी अभिनव उपक्रम<br>➢ पारंपारिक नाणी/शस्त्र/भांडी इ.संग्रहांचे प्रदर्शन<br>➢ साहित्य विषयक उपक्रम<br>➢ लूप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन | १० |
| ३. | १.राज्यातील गडकिल्ले यांचे जतन व सवंर्धन (५ गुण)<br>२.राष्ट्रीय /राज्य स्मारके, धार्मिक स्थळांविषयी जन जागरूकता, जतन व संवर्धन (५गुण) | १० |
| ४. | **१.सामाजिक उपक्रम (प्रत्येकी २ गुण)**<br>➢ महिला सक्षमीकरण<br>➢ पर्यावरण रक्षण<br>➢ वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार<br>➢ व्यसनमूक्ती/अंधश्रध्दा निर्मूलन/ सामाजिक सलोखा<br>➢ ज्येष्ठ नागरीकांसाठी उपक्रम<br>➢ आरोग्यविषयक उपक्रम<br>➢ शैक्षणिक उपक्रम<br>➢ कृषीविषयक उपक्रम<br>➢ आधुनिक तंत्रज्ञानाची जनजागृती<br>➢ वंचित घटकांसाठी उपक्रम<br>**२.कायमस्वरूपी सामाजिक उपक्रम राबविणा-या सार्वजनिक गणेश मंडळांना ५ गुण देण्यात यावेत.**<br>उदा. सार्वजनिक गणेश मंडळांकडून कायमस्वरूपी राबविण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा, ग्रंथालय, वृध्दाश्रम,एखादे गाव दत्तक घेणे व इतर सामाजिक सेवा | २५ |
| ५. | पर्यावरणपुरक मूर्ती | ५ |
| ६. | पर्यावरणपुरक सजावट (थर्माकोल / प्लॅस्टीक विरहीत) | ५ |
| ७. | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण | ५ |
| ८. | पारंपारिक / देशी खेळांच्या स्पर्धा | १० |

| | | |
|---|---|---|
| ९. | **गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा(प्रत्येकी २ गुण)**<br>➢ पिण्याच्या पाण्याची सोय<br>➢ प्रसाधनगृह<br>➢ वैद्यकीय प्रथमोपचार<br>➢ वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन/ आयोजनातील शिस्त<br>➢ परिसरातील स्वच्छता | १० |
| | **एकूण** | १०० |

**( सदर स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांनी केलेल्या कार्याबाबतचा कालावधी हा सन २०२३ च्या अनंत चतुदर्शी ते सन २०२४ च्या गणेश चतुदर्शी पर्यंतचा असेल.)**

२.२ वरील बाबींची पुर्तता करणाऱ्या / करु शकणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने करावयाच्या अर्जाचा नमुना या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट "अ"** मध्ये सोबत जोडला आहे.

२.३ सदर गणेशोत्सव स्पर्धेअंतर्गत भाग घेणा-या मंडळांपैकी मागील सलग २ वर्षे राज्यस्तरीय / जिल्हास्तरीय पारितोषिक प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत.सदरची अट इतर मंडळांना संधी देण्याच्या उददेशाने नमूद करण्यात आली आहे.

२.४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या **mahotsav.plda@gmail.com** या इमेलवर सदर स्पर्धेचे परिपूर्ण अर्ज **दि.०१.०८.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ पूर्वी** सादर करावेत. तसेच, प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र ईमेल आयडी तयार करुन सदर ईमेल आयडी संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना **दि. १०.०८.२०२४ पूर्वी** कळवावे.

२.५ संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी प्राप्त झालेले जिल्हा निहाय अर्ज संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास **दि.०५.०९.२०२४ पूर्वी** उपलब्ध करुन द्यावेत.

२.६ सदर स्पर्धेतीलविजेत्यांची निवड करण्यासाठी पुढीलप्रमाणे **जिल्हास्तरीय निवड समिती** राहिल.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीतील पदनाम** |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी | अध्यक्ष |
| २) | शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी **(गट-अ/ब संवर्गातील)** | सदस्य |
| ४) | जिल्हयातील आरोग्य अधिकारी**(गट-अ/ब संवर्गातील)** | सदस्य |
| ५) | जिल्हयातील पोलीस अधिकारी**(गट-अ/ब संवर्गातील)** | सदस्य |
| ६) | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य सचिव |

संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे वरील अधिकाऱ्यांची नियुक्ती व त्यांचे समन्वय करतील. उपरोक्त निवड समिती प्रत्यक्ष उत्सवस्थळी भेट देतील तसेच मंडळाकडून व्हिडीओग्राफी व कागदपत्र जमा करुन घेतील. जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येईल. **सदर समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी १** सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची शिफारस करुन त्यांची नावे सर्व कागदपत्र व व्हिडीओसह राज्यस्तरीय निवड समितीकडे देण्यासाठी जिल्ह्याधिकाऱ्यांमार्फत, संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई यांना त्यांच्या mahotsav.plda@gmail.com या ईमेल आयडीवर सादर करतील.

२.७ जिल्हास्तरीय निवड समितीकडून शिफारस केलेल्या यादयांमधून राज्यस्तरीय ३ विजेते क्रमांक निवडण्यासाठी राज्य स्तरावर पुढीलप्रमाणे निवड समिती राहिल -

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | सर जे.जे. कला विद्यालयाचे अधिष्ठाता / वरिष्ठ प्राध्यापक | अध्यक्ष |
| २ | **पर्यावरण विभागातील वरिष्ठ गट-अ मधील अधिकारी** | **सदस्य** |
| ३ | राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य सचिव |

सदर दोन्ही समितींसाठी संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी हे समन्वयक असतील.

२.८ राज्यस्तरीय निवड समिती ही जिल्हास्तरीय निवड समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यांतून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ४४ प्राप्त शिफारशीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधून गुणांकन व संबंधित कागदपत्राच्या आधारे पहिल्या ३ विजेत्यांची निवड करतील व त्यांचा अहवाल संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्याकडे सादर करतील.

२.९ राज्यातील पहिल्या ३ विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुढीलप्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल.

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|
| रु.५.०० लक्ष | रु. २.५ लक्ष | रु.१.०० लक्ष |

राज्यस्तरीय निवड समितीकडे जिल्हास्तरीय निवड समितीने निवड केलेल्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे ३ विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस राज्य शासनाकडून प्रत्येकी रु.२५,०००/- चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

**२.१०** सदर गणेशोत्सव स्पर्धेत जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय निवड समितीने घेतलेल्या निर्णयावर कोणत्याही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आक्षेप घेता येणार नाही.

**२.११** सदर गणेशोत्सव स्पर्धेअंती राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विजेत्या सार्वजनिक गणेश मडळांची यादी स्वतंत्रपणे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येईल.

**२.१२** सदर स्पर्धेत सहभागी होणा-या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही परिस्थितीत विभागून राज्यस्तरीय अथवा जिल्हास्तरीय पारितोषिक विजेते गणेशोत्सव मंडळ म्हणून घोषित करता येणार नाही, याबाबतची दक्षता जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय निवड समितीने घेणे आवश्यक आहे. मात्र, सदर गणेशोत्सव स्पर्धेअंतर्गत समान गुणांकन प्राप्त झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी ज्या मंडळाच्या स्थापनेला जास्त वर्षे झालेली आहेत, त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास पारितोषिकासाठी प्राधान्य देण्यात येईल.

**०३.** जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय निवड समितीतील सर्व सदस्यांना शासनाच्या प्रचलित दैनिक भत्ता व प्रवास भत्ता धोरणानुसार अनुज्ञेय राहिल व त्यासाठी होणारा खर्च संबंधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चातून भागवावा.

**०४.** सदर स्पर्धेसाठी होणारा खर्च, मागणी क्रमांक "झेडडी-०२, २२०५ कला व संस्कृती (१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (२२०५ १४६३)" ५० इतर खर्च (अनिवार्य) या लेखाशीर्षाखाली सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

**०५.** यासाठी संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**०६.** सदरशासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३ /प्र.क्र.३० /२०१३ /विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकारी नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन मधील, अनु क्र.४, परिच्छेद क्रमांक २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**०७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०७३११५१००६१४२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नंदा राऊत )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) सर्व पोलीस आयुक्त
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१३) सर्व विभागीय आयुक्त
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व जिल्हा पोलिस अधीक्षक
१६) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१७) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
१८) संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई

१९) अधिष्ठाता, सर. जे.जे. कला महाविद्यालय, मुंबई

२०) अवर सचिव (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

२१) राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य

२२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१ मुंबई

२३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

२४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

२५) निवडनस्ती/सां.का.२

**परिशिष्ट "अ"**

**सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०२४**

**सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने भरावयाचा अर्जाचा नमुना**

| **अ. क्र.** | **बाब** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | जिल्हा, तालुका | |
| २ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे नाव | |
| ३ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी यांचे नाव व भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल | |
| ४ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ५ | उत्सव स्थळ | |
| ६ | धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या संस्था नोंदणी क्रमांक, नोंदणीचे वर्ष किंवा स्थानिक पोलीसांची परवानगी घेतली असल्यास त्याचा तपशील किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी असल्यास त्याचा तपशील | |
| ७ | गणेशोत्सव मंडळ स्थापनेचे वर्ष | |
| ८ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे बँक खाते क्रमांक आयएफएससी कोड नंबर व पॅनकार्ड क्र.<br>(संस्थेचा रद्द केलेला धनादेश सोबत जोडण्यात यावा) | |
| | **स्पर्धेच्या गुणांकासाठी आवश्यक माहिती** | |
| **अ.क्र.** | **बाब** | **होय / नाही व तपशील देण्यात यावा (आवश्यक त्या परिपूर्ण कागदपत्रांसह)** |
| १ | **सांस्कृतिक कार्यक्रम / स्पर्धांचे आयोजन**<br>➢ गायन<br>➢ वादन<br>➢ नृत्य<br>➢ नाटय<br>➢ लोककला<br>➢ आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कला | |

| | | |
|---|---|---|
| | ➢ हस्तकला<br>➢ चित्रकला<br>➢ शिल्पकला<br>➢ माहितीपट/चित्रपट | |
| २ | **संस्कृतीचे जतन/ संवर्धन**<br>➢ पोषाखसंस्कृती/खाद्यसंस्कृती/वाद्यसंस्कृती<br>➢ संस्कृती संवर्धनासाठी अभिनव उपक्रम<br>➢ पारंपारिक नाणी/शस्त्र/भांडी इ.संग्रहांचे प्रदर्शन<br>➢ साहित्य विषयक उपक्रम<br>➢ लूप्त होणा-या कलाविष्कारांचे संवर्धन | |
| ३ | १.राज्यातील गडकिल्ले जतन सर्वधन<br>२.राष्ट्रीय /राज्य स्मारके, धार्मिक स्थळांविषयी जन जागरूकता, जतन व संवर्धन | |
| ४ | **१.सामाजिक उपक्रम**<br>➢ महिला सक्षमीकरण<br>➢ पर्यावरण रक्षण<br>➢ वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार<br>➢ व्यसनमूक्ती/अंधश्रध्दा निर्मूलन/ सामाजिक सलोखा<br>➢ ज्येष्ठ नागरीकांसाठी उपक्रम<br>➢ आरोग्यविषयक उपक्रम<br>➢ शैक्षणिक उपक्रम<br>➢ कृषीविषयक उपक्रम<br>➢ आधुनिक तंत्रज्ञानाची जनजागृती<br>➢ वंचित घटकांसाठी उपक्रम<br>**२.कायमस्वरूपी राबविण्यात आलेले सामाजिक उपक्रम** | |
| ५ | पर्यावरणपुरक मूर्ती | |
| ६ | पर्यावरणपुरक सजावट<br>(थर्माकोल / प्लॅस्टीक विरहीत) | |
| ७ | ध्वनीप्रदुषण रहित वातावरण | |
| ८ | पारंपारिक / देशी खेळांच्या स्पर्धा | |
| ९ | **गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा**<br>➢ पिण्याच्या पाण्याची सोय<br>➢ प्रसाधनगृह | |

| | | |
|---|---|---|
| | ➢ वैद्यकीय प्रथमोपचार<br>➢ वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन/ आयोजनातील शिस्त<br>➢ परिसरातील स्वच्छता | |
| १० | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांस यापूर्वी राज्यस्तरीय/ जिल्हास्तरीय पारितोषिके/ प्रशस्तीपत्रके प्राप्त झाली असल्यास त्याचा वर्षनिहाय तपशील | |
| ११ | सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सर्व प्रकारच्या आवश्यक परवानग्या घेतल्याचे पुरावे<br>(उदा. स्थानिक स्वराज्य संस्था / पोलीस/ वीज कंपनी / जागेची परवानगी) | |

**( स्पर्धेत सहभागी गणेशोत्सव मंडळांनी केलेल्या कार्याबाबतचा कालावधी हा सन २०२३ च्या अनंत चतुदर्शी ते सन २०२४ च्या गणेश चतुदर्शी पर्यंतचा असेल.)**

प्रमाणित करण्यात येते की, सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२४ अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या दि.३१ जूलै,२०२४ च्या शासन निर्णयात नमूद सर्व अटी व नियम वाचले असून, त्यासर्वांचे आम्ही पालन करीत आहोत. तसेच, उपरोक्त अर्जात नमूद करण्यात आलेली माहिती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अभिलेख्यांनुसार अचुक व खरी आहे. ही माहिती चुकीची किंवा खोटी आढल्यास आमच्या मंडळाला स्पर्धेतून बाद केल्यास ते आम्हास मान्य राहील.

**स्वाक्षरी**

**स्थळ :** **संस्था अध्यक्ष / सचिव**

**दिनांक :** **(रबरी शिक्क्यासह)**